# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०९/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

## सार्वजनिक गणेशोत्सवाकरीता नागपूर ग्रामीण पोलीसाकडुन चोख बंदोबस्त

### १) गणपती स्थापनेची माहिती –२०२४

| पोलीस स्टेशन | खाजगी गणपती | सार्वजनिक गणपती | | | एकुण सार्वजनिक |
|---|---|---|---|---|---|
| | | लहान | मोठे | एक गाव एक गणपती | |
| एकुण २२ | १४८९९ | २०५ | २१४ | १३८ | ५४६ |

### २) गणेशोत्सव करीता लावण्यात येणारा बंदोबस्त

| SP | ADD. SP | Dysp | PI | API/PSI | अंमलदार | | होमगार्ड | | SRPF |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पुरूष | महिला | पुरूष | महिला | |
| ०१ | ०१ | ०७ | २५ | १२० | १२५० | २५० | ५५० | १०० | ०१ plt |

३) गणेशोत्सव सणाचे अनुषंगाने प्रस्तावित प्रतिबंधक कारवाई जिल्हयातील एकुण ७७६ गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे

४) दि. ०७/०९/२०२४ ते दि. २०/०९/२०२४ पर्यंत गणेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे. सन २०२१ पासुन नागपुर महानगर पालिका अंतर्गत येणाऱ्या फुटाळा, अंबाझरी, शुक्रवारी व कोराडी तलावात गणेशमुर्ती विसर्जन करण्यास प्रशासनाने मनाई केलेली आहे. त्यामुळे नागपुर महानगर पालिका हद्दीतील अंदाजे १००० ते १२०० सावर्जनिक व १०,००० ते ११,००० खाजगी/घरगुती गणपती विसर्जनाकरीता नांदा कोराडी कृत्रिम तलाव (हौद), कोलार नदी, किल्ले कोलार घाट या ठिकाणी येतात. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कोणत्याही नैसर्गिक पाण्याचा स्त्रोतामध्ये विसर्जन करता येणार नाही असे आदेश झाल्याने कोलार नदीमध्ये कोणतेही गणेश मुर्तीचे विसर्जन होणार नसल्याने कोराडी नांदा कृत्रिम तलाव येथे नागपूर शहर आणि ग्रामीण मधील सार्वजनिक तथा खाजगी गणपती विसर्जन करता येणार असल्याने दिनाक ०५/०९/२०२४ रोजी नांदा कोराडी कृत्रिम तलाव व कोलार नदी घाट येथील विसर्जन स्थळाची संयुक्तरित्या पाहणी करण्याकरीता विविध विभागातुन अधिकारी आणि कर्मचारी यांची सभा घेण्यात आली. सभेत मा. श्रीमती अश्विनी दोरजे पो. सह. आयुक्त, मा. श्री अभिजित चौधरी, आयुक्त महानगरपालिका, नागपूर, मा. श्रीमती आंचल गोयल, अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, नागपूर, मा. श्री शेवाळे अतिरिक्त पो. आयुक्त, ना.श. मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण आणि मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्री निकेतन कदम, पोलिस उपायुक्त, परिमंडळ ५. ना.श. श्री संतोष खांडेकर, सहा. पो. आयुक्त, जरिपटका विभाग,

तहसिलदार नागपूर शहर संतोष खांडरे आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील वरीष्ठ अधिकारी तसेच पो.नि जिल्हा विशेष शाखा, वाहतुक शाखा चे अधिकारी हजर होते. विसर्जन करीता लागणारे मनुष्यबळ, साहित्य याचा आढावा घेण्यात आला. ५) गणेशोत्सव आणि ईद ए मिलाद शांततेत पार पाडावा म्हणुन पोलीस स्टेशन स्तरावर तसेच उपविभागीय स्तरावर एकुण ३२ शांतता कमिटीच्या बैठका घेण्यात आल्या. बैठकीमध्ये शांतता कमिटीचे सदस्य /पोलीस पाटील / डि.जे. वादय वाजविणारे तसेच महसुल विभागातील अधिकारी/कर्मचारी हजर होते.

६) गणेशोत्सव दरम्यान ०३ पोलीस स्टेशन अंतर्गत (फ्लॅग मार्च) दंगा काबू योजना घेण्यात आलेले आहेत तसेच गणपती स्थापनेनंतर प्रत्येक पोलीस स्टेशनला दंगा काबू योजनेची तालिम घेण्यात येणार आहे.

**७) नागपूर ग्रामीण पोलीसांतर्फे जो मंडळ स्त्री सुरक्षा व रोड अपघात नियंत्रण जन जागृती करण्याबाबत चांगले उपक्रम राबविल अश्या गणेशोत्सव मंडळांना योग्य तो पुरस्कार देण्याची घोषणा पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांनी केलेली आहे.**

**८) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानूसार कोणतेही नैसर्गिक पाणी जसे नदी, नाले, तलाव यात गणेश मुर्तीचे विसर्जन केल्याने नैसर्गिक आपत्ती निर्माण होते, म्हणुन त्यात कोणीही विसर्जन करणार नाही. प्रत्येक विसर्जन च्या स्थळी कृत्रिम टॅन्क शासनाकडुन तयार करून देण्यात येणार आहे. तरी लोकांनी न्यायालयाच्या आदेशानूसार कृत्रिम टॅन्क मध्येच गणेश मुर्तीचे विसर्जन करावे. तसेच सार्वजनिक गणेश उत्सवामध्ये कोणतेही डी. जे. वादय वाजविण्यास मनाई करण्यात आली आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर